"Spread Knowledge unto the Last"

# Sangamner Nagarpalika Arts, D. J. Malpani Commerce & B. N. Sarda Science College, Sangamner, (Autonomous) Dist. Ahmednagar (Maharashtra)

NAAC 3rd Cycle A+ Grade (CGPA 3.58)

ISO 9001 - 2008 Certified College

- DBT Star STATUS
- DST- FIST



Savitribai Phule Pune University Best College Award 2019



Savitribai Phule Pune University Best Teacher Award 2019



Gold Medal (Earn & learn Scheme) Supriya Godase 2019

# INFORMATION BROCHURE 2021-22

Download College Android App from Google play store

Telegram channel link - t.me/SangamnerCollege

visit us at www.sangamnercollege.edu.in

Satish Gore 9822431321

संस्कृतात्मा पुरस्कार



आरोग्य तपासणी





पर्यावरण व गड संवर्धन सायकल रॅली (शिवनेरी)




अविष्कार



सुजाता देशमुख
(प्रजासत्ताक दिन, दिल्ली परेड सहभाग)



सांस्कृतिक महोत्सव पारितोषिके



मैदानी स्पर्धा

उन्नत भारत अभियान





भारतीय कंपनी सचिव संस्था
(ICSI) Study Centre

प्लेसमेंट सेल



प्रा.डॉ.प्रफुल्ल पवार, रजिस्ट्रार, सा.फु.पुणे विद्यापीठ,पुणे




विद्यार्थी सुविधा केंद्र व MS-CIT सेंटर




पर्यटन दिन बी.व्होक.(H&T)



निसर्गोपचार केंद्र






















प्रा.डॉ.नितीन करमाळकर, कुलगुरू, सा.फु.पुणे विद्यापीठ, पुणे


# यु.जी.सी. व सा.फु.पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त बी.व्होक. अभ्यासक्रम












|| प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ||

Shikshan Prasarak Sanstha's

# Sangamner Nagarpalika Arts, D.J. Malpani Commerce & B.N. Sarda Science College

Sangamner - 422 605. Dist. Ahmednagar

Phone : (02425) : 225893, 223181.

**Affiliated to Savitribai Phule Pune University**

**(Id. No. PU/AN/ASC/03/1961)**

- NAAC Re-accredited 'A+' Grade (CGPA 3.58)
- DST FIST Sponsored College
- Savitribai Phule Pune University Best College Award
- DBT Star College

**Website** : www.sangamnercollege.edu.in **E-mail** : info@sangamnercollege.edu.in

**Spread knowledge unto the last**

| | | | |
|---|---|---|---|
| **Principal (In-Charge)** | : | **Prof. Dr. A. H. Gaikwad** | Mob. 9822811761. |
| **Vice Principal (Science)** | : | **Dr. R. S. Laddha** | Mob. 9860441810. |
| **Vice Principal (Arts)** | : | **Dr. R. B. Tasildar** | Mob. 9850264499. |
| **IQAC Co-ordinator** | : | **Mr. S. A. Pingle** | Mob. 9422089803. |
| **Registrar** | : | **Shri. S. E. Phapale** | Mob. 9921151188. |

## Office Time

| | | | |
|---|---|---|---|
| Monday to Friday | : | 9.30 a.m. to 1.00 p.m., | 2.00 p.m. to 5.30 p.m. |
| Saturday | : | 9.30 a.m. to 1.00 p.m. (Afternoon Closed) | |

## Account Section Time

| | | | |
|---|---|---|---|
| Monday to Friday | : | 9.30 a.m. to 1.00 p.m., | 2.00 p.m. to 4.00 p.m. |
| Saturday | : | 9.30 a.m. to 12.00 noon (Afternoon Closed) | |

**Name : Shri / Ku / Other** ______________________

**Class :** ______________ **Div. :** ______________

**Roll No.** ______________ **P.R.No.** ______________

## अनुक्रमणिका


| अनु.क्र. | तपशिल | पान नं. |
|---|---|---|
| १) | महाविद्यालयाचे व्हिजन, मिशन, गुणवत्ता धोरण, भौतिक व पायाभूत सुविधा आणि वैशिष्ट्ये | ०३. |
| २) | ऑनलाईन प्रवेशासंबंधी आवश्यक माहिती | ४-६. |
| ३) | महाविद्यालयात चालविले जाणारे अभ्यासक्रम, संशोधन केंद्रे, विद्यार्थी केंद्रित उपक्रम कौशल्याधिष्टित अभ्यासक्रम व दूरशिक्षण अभ्यासक्रम | ६-७. |
| ४) | बी.व्होक.अभ्यासक्रम,एम.एस.सीआयटी, य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यासक्रम, टि.म.वि.अभ्यासक्रम SHREYAS - उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांकरिता शिकाऊ उमेदवार व कौशल्य योजना | ०८. |
| ५) | प्रवेश क्षमता (Intake Capacity) - UG Courses | ९-१०. |
| ६) | प्रवेश क्षमता (Intake Capacity) - PG Courses & Research Centers | ११-१२. |
| ७) | शैक्षणिक पात्रता नियमावली | १३. |
| ८) | संस्था / महाविद्यालयाकडून देण्यात येणाऱ्या योजना व पुरस्कार | १४-१५. |
| ९) | परीक्षेसंबंधी आवश्यक माहिती | १५. |
| १०) | शारीरिक शिक्षण परीक्षा माहिती | १६. |
| ११) | विद्यार्थ्यांना दिले जाणारे विविध दाखले | १७-१८. |
| १२) | श्री. माधवलाल मालपाणी योग व निसर्गोपचार केंद्र | १८-१९. |
| १३) | महाविद्यालय ग्रंथालयाची वैशिष्ट्ये, विद्यार्थी मतदार जागृती अभियान | १९. |
| १४) | विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता | २०-२१. |
| १५) | रॅगिंग संदर्भात नियमावली | २२. |
| १६) | रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाय योजना, अपघात विमा योजना | २३. |
| १७) | अंतर्गत तक्रार समिती | २४. |
| १८) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे अभ्यास व अभ्यासेत्तर उपक्रमांचे वार्षिक नियोजन | २४. |
| १९) | परिपत्रक, फी व वर्तणुकीसंबंधी नोंदी | २५-२६. |
| २०) | शिष्यवृत्ती विभाग | २७-४५. |

## Vision Statement : - 'Spread knowledge unto the last'

## Mission Statement : -

We aim to make local excellence globally competitive by employing innovative and skill based educational programmes for the students from diverse cultural backgrounds. We strive to boost the self confidence of our students through their spiritual, moral, intellectual, social, emotional and physical developement by offering value based education. With efforts to create eco-consciousness and social awareness amongst our stakeholders, we endeavor to make the institute a quality learning place with conducive atmosphere.

### गुणवत्ता धोरण :–

''आम्ही, संगमनेर महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व व्यवस्थापन समितीचे सदस्य, विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी आवश्यक ते ज्ञान व कौशल्ये वाढवणारे दर्जेदार शिक्षण देणे हे आमचे कर्तव्य समजतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि समाजाचे हित डोळ्यापुढे ठेवून, तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचविण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्न करु. हे साध्य करण्यासाठी आम्ही समाजाशी बांधील असलेले आणि मूल्ये जोपासणारे शिक्षण देऊ, आणि शिक्षणामध्ये सतत सुधारणा करण्यासाठी व सामान्य लोकांच्या आर्थिक, सामाजिक विकासासाठी प्रयत्न करु.''

## Quality Policy :-

" We, the management member and college staff are committed to impart best education, by equipping students with knowledge and skills necessary for building their career.

In our quest for excellence, all our efforts will also have the motto of spreading knowledge unto the last, keeping in mind the holistic development of the students and best interest of the society at large."

This will be a achieved by imparting committed, value based education with continual improvement in educational services and supporting the masses in their overall socio-economic development.

### भौतिक व पायाभूत सुविधा आणि वैशिष्ट्ये

- नॅक द्वारा 'अ $^{+}$' **(CGPA 3.58)** श्रेणी प्राप्त महाविद्यालय
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून स्वायत्त महाविद्यालय
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार शैक्षणिक वर्ष २०१९-२०.
- डीबीटी स्टार कॉलेज अंतर्गत भारत सरकारकडून ८२ लाखांचे अनुदान.
- DST - FIST (Department of Science & Technology) कडून **FIST** अंतर्गत ७० लाखांचे अनुदान.
- सुसज्ज प्रयोगशाळा
- सुसज्ज सेमिनार हॉल्स
- समृद्ध ग्रंथालय
- ५० एकराचा विस्तीर्ण निसर्गरम्य परिसर.
- मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह
- पदव्युत्तर संशोधन केंद्र

- विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र इंटरनेट कक्ष
- Innovation & Start-up Cell.
- 100 MBPS Line of Internet.
- Wi-Fi ग्रंथालय.
- दिव्यांगासाठी विशेष सुविधा.
- विद्यार्थीनींसाठी - विद्यार्थीनी कक्ष
- प्रशस्त क्रीडांगण व ४०० मी. रनिंग ट्रॅक, ओपन जिम.
- विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम.
- Solar Panel
- ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी टॅबलेटची सुविधा.
- विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र पार्किंग सुविधा.
- विद्यार्थी ई-सुविधा केंद्र.

## ऑनलाईन प्रवेशासंबंधी आवश्यक माहिती

- अंतिम गुणवत्ता यादीमध्ये नांव असलेल्या विद्यार्थ्यांनीच ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरावा.
- जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्याबाहेरून या महाविद्यालयात प्रवेश घेणार असतील त्यांनी मा. प्राचार्यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरू नये.
- विद्यार्थ्यांनी http://sangamnercollege.vriddhionline.com या लिंकवर जावून ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरावा.
- **ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी आधार संलग्न कायम स्वरुपाचा मोबाईल नंबर वापरावा. तसेच विद्यार्थ्यांचा स्वतःचा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.**
- अंतिम प्रवेश यादीमध्ये नाव असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश फॉर्म भरण्यापूर्वी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांचे पालन करावे.
- ऑनलाईन प्रवेश फॉर्मबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी विद्यार्थी सुविधा केंद्र (MS-CIT) येथे संपर्क साधावा.

  (**कला** : मो.नं.७६२०१११६८९, ८६२३०३६२०२, ७५१७३४९५४२, ९८६०४७०१२८.
  **वाणिज्य** : मो.नं. ७८७५०८५७०१, ८६०५८९१९२२, ९९२२१८४९५५.

  **विज्ञान** : मो.नं. ८८०६५१९७४०, ८३२९११५६५१, ९६३७८३७०२१, ७९७२०२३४५३.

  **बी.व्होक.** : मो.नं. ७३८७७०९६९६, ७३८७६२०५८१, ९५१८७३८८९०.)
- ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांकडे अलिकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो, मागील वर्षी पास झाल्याचे मार्कशीट, शाळा सोडल्याचा दाखला इ. सॉफ्टकॉपी असणे अनिवार्य आहे. म्हणजे आवश्यक त्या ठिकाणी ते अपलोड करणे शक्य होईल.
- ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरतांना विद्यार्थ्यांकडे स्वतःची सर्व मुळ (Original) कागदपत्रे (Hard Copy) असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश फॉर्ममध्ये आपणांस हवे असलेले विषय किंवा ॲडमिशन समितीकडून देण्यात आलेले विषय अचूकपणे निवडावेत. एकदा विषय निवडल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.
- **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश फॉर्म पूर्ण भरल्यानंतर त्याची प्रिंट आऊट काढून त्यासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.**

  १. शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला व झेरॉक्स प्रत.
  २. मागील वर्षी पास झालेल्या वर्गाचे मार्कशीट झेरॉक्स प्रत.
  ३. गॅप सर्टिफिकेट मूळ प्रत व झेरॉक्स प्रत (लागू असेल तर)
  ४. मायग्रेशन सर्टिफिकेट मूळ प्रत व झेरॉक्स प्रत (लागू असेल तर)
  ५. जातीचा दाखला झेरॉक्स प्रत.

६. पासपोर्ट साईज फोटो (आवश्यकतेनुसार)
७. मतदार यादीत नाव दाखल केल्याची पोहोच पावती / मतदान कार्ड झेरॉक्स प्रत.
८. आधार कार्ड झेरॉक्स प्रत.
९. राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत.
१०. पॅनकार्डची झेरॉक्स प्रत.
११. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (डोमिसाईल) असल्याबाबतचा दाखला.
१२.मा. तहसिलदार यांचा मागील शैक्षणिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.

- त्यानंतर सदर फॉर्म महाविद्यालयाच्या ॲडमिशन समितीकडून तपासून घ्यावा. सदर फॉर्मवर महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा उपप्राचार्य यांची स्वाक्षरी घेवून आवश्यक ती फी भरून फॉर्म अकौंट विभागामध्ये जमा करावा. फॉर्म जमा केल्याची रीतसर पावती घ्यावी. त्यानंतरच आपला प्रवेश निश्चित होईल.
- डिप्लोमा पास होवून प्रवेश घेणाऱ्यांसाठी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त बाहेरील विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी मायग्रेशन सर्टिफिकेट आवश्यक आहे.
- विद्यार्थी १० वी ते पदव्युत्तर परीक्षा एकापेक्षा अनेक वेळा प्रयत्न करून उत्तीर्ण झाला असेल, किंवा अन्य कुठल्या कारणास्तव शिक्षणात खंड पडला असेल अशा विद्यार्थ्यांनी गॅप ॲफिडेव्हिटची मूळ प्रत ॲडमिशन फॉर्मसोबत जोडावी तसेच सदर झेरॉक्स प्रत शिष्यवृत्ती व इलिजिबिलिटी फॉर्म सोबत जोडावी.
- ऑनलाईन प्रवेश फॉर्मची प्रिंट व इतर कागदपत्रे कुरियरने अथवा पोस्टाने पाठवू नये. असे प्रवेशफॉर्म स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
- **Merit List बाबत ...**

  महाविद्यालयातील सर्व वर्गांच्या गुणवत्ता याद्या तयार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तपशीलासह ऑनलाईन फॉर्म भरून घेतले जातात. विद्यार्थ्यांनी मेरीटसाठी ऑनलाईन फॉर्म बिनचुक भरणे आवश्यक आहे, विद्यापीठ व शासन नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी प्रदर्शित केली जाते.
- अंतिम गुणवत्ता तयार झाल्यानंतर गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांनीच ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरावा.
- महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रकानुसार शैक्षणिक फी आकारली जाते. यासंबंधीची परिपत्रके सूचना फलकावर वेळोवेळी लावली जातात.
- लिव्हिंग सर्टिफिकेटची मूळ प्रत नसेल तर शिष्यवृत्ती / इतर सवलती मंजूर होणार नाही.
- आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी पूर्वीच्या इबीसी सवलत योजनेऐवजी शासनाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (RCSMSSSY) सुरू केलेली आहे. विद्यार्थ्यांनी सदरचा फॉर्म शासनाने निर्धारीत केल्यानुसार (ऑनलाईन किंवा ऑफलाईन) ठरवून दिलेल्या मुदतीत भरून संबंधित विभागात जमा करावा. फॉर्म वेळेत जमा न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांकडून संपूर्ण वर्षाची शैक्षणिक फी वसूल केली जाईल. त्याविषयी सर्व जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहिल. त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.
- SC/ST/DT/NT/OBC/SBC या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती/ फ्रिशीप या सवलतीमधून प्रवेश घेतला असेल तर सदर विद्यार्थ्यांने शिष्यवृत्तीचा / फ्रिशीपचा फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरून संबंधित विभागात वेळेत जमा करावा. ऑनलाईन फॉर्म वेळेत न भरल्यास संबंधित विद्यार्थ्यांकडून संपूर्ण वर्षाची शैक्षणिक फी वसूल केली जाईल. त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

- विद्यार्थ्यांनी विद्यापीठ व महाविद्यालय परीक्षा फॉर्म दिलेल्या मुदतीमध्ये भरणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत परीक्षा फॉर्म भरला नाहीतर होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणारनाही.
- महाविद्यालयात प्रवेश घेतांना शाळा सोडल्याच्या दाखल्याची मूळ प्रत जमा करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी दाखल्याच्या किमान १० झेरॉक्स प्रती काढून काही प्रती महाविद्यालयातून साक्षांकित करून घ्याव्यात. साक्षांकित केलेली एक प्रत लॅमिनेशन करून कायम स्वरुपी जतन करून ठेवावी. ती एक प्रत दाखवून गरज असेल तेव्हा इतर प्रती साक्षांकित करुन घ्याव्यात.
- ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरला म्हणजे आपले ॲडमिशन झाले असे नाही. वरीलप्रमाणे पुढील पुर्तता वेळेत करणे आवश्यक आहे.
- प्रवेश प्रक्रियेतील होणारे बदल व अन्य शैक्षणिक बाबींसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्ड / काचफलकावरील सूचना वेळोवेळी पाहणे आवश्यक आहे.
- ऑनलाईन प्रवेशासंबंधी ऐनवेळी बदल करण्याचे सर्व अधिकार मा. प्राचार्य यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

## महाविद्यालयात चालविले जाणारे अभ्यासक्रम

| पारंपारिक अभ्यासक्रम | व्यावसायिक अभ्यासक्रम |
|---|---|
| • बी.ए. | • बी.बी.ए. |
| • बी.कॉम. | • बी.बी.ए. (कॉम्प्युटर ॲप्लीकेशन) |
| • बी.एस्सी. | • बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) |
| • एम्.ए. (मराठी,हिंदी,इंग्रजी,संस्कृत,अर्थशास्त्र,राज्यशास्त्र) | • एम्.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) |
| • एम्.कॉम. | • बी.व्होकेशनल (सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट) |
| • एम्.एस्सी. (पदार्थ विज्ञान,रसायनशास्त्र,वनस्पतीशास्त्र,प्राणीशास्त्र, भूगोल, गणित,इलेक्ट्रॉनिक्स) | • बी.व्होकेशनल ( हॉस्पिटॅलिटी ॲण्ड टुरिझम) |
| • एम्.कॉम. (आय.टी.) | • बी.सी.ए. (सायन्स) |
| • पी.जी. डिप्लोमा इन जर्नालिझम (मराठी माध्यम) | • बी.व्होकेशनल (डेअरी प्रॉडक्टस् ॲण्ड प्रोसेसिंग) |
| • पी.जी. डिप्लोमा इन बँकिंग | • बी. व्होकेशनल (ॲग्रीकल्चर ॲण्ड सॉईल सायन्स) |
| • पी.जी. डिप्लोमा इन टॅक्सेशन | • बी.व्होकेशनल (अकौंटिंग ॲण्ड टॅक्सेशन) |
| • सर्टिफिकेट कोर्स इन जर्मन • सर्टिफिकेट कोर्स इन फ्रेंच | |

**ढोबळमानाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या अध्ययनक्रमाची व पाठ्यक्रमाची सूची अध्ययन तासिका, प्रात्यक्षिक सत्रे आणि इतर प्रकल्प याबाबतची माहिती महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर (www.sangamnercollege.edu.in) पाहण्यासाठी उपलब्ध आहे.**

**महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत खालील संशोधन केंद्रे कार्यान्वित आहेत.**

| | |
|---|---|
| • Research Center in Marathi | • Research Center in Politics |
| • Research Center in Hindi | • Research Center in Commerce |
| • Research Center in English | • Research Center in Physics |
| • Research Center in Sanskrit | • Research Center in Chemistry |
| • Research Center in Economics | • Research Center in Zoology |

## महाविद्यालयातील विद्यार्थी केंद्रित उपक्रम

| विद्यार्थी विकास मंडळ | महाविद्यालयातील उपक्रम |
|---|---|
| • कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा आणि शिका'<br>• आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण<br>• एन्.सी.सी.<br>• वार्षिक नियतकालिक 'अर्घ्य'<br>• निर्भय कन्या अभियान<br>• महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष<br>• विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास<br>• सांस्कृतिक मंडळ<br>• विद्यार्थी केंद्रित उपक्रम (कार्यशाळा,शिबीर व इतर) | • एन्.एस्.एस्.<br>• करिअर गायडन्स अॅण्ड प्लेसमेंट सेल<br>• आरोग्य तपासणी व विद्यार्थी समुपदेशन केंद्र<br>• कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम<br>• मुक्तांगण अंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र<br>• आविष्कार संशोधन स्पर्धा<br>• प्राचार्य म.वि.कौण्डिण्य विद्यार्थी संशोधन प्रकल्प स्पर्धा<br>• डॉ.बाबासाहेब आंबेडकर वादविवाद स्पर्धा<br>• विशेष मार्गदर्शन योजना<br>• पर्यावरण जाणीव जागृती<br>• महाविद्यालय शाळा समुह योजना<br>• आजीवन अध्ययन व विस्तार सेवा<br>• क्रीडा संवर्धन मंडळ<br>• बहि:शाल शिक्षण मंडळ<br>• वादविवाद मंडळ<br>• विद्यार्थी विकास मंडळ |

## कौशल्याधिष्टीत अभ्यासक्रम व दूरशिक्षण अभ्यासक्रम

मुक्तांगण ग्रामीण कौशल्य विकास केंद्र व संगमनेर महाविद्यालय यांचे विद्यमाने

| | |
|---|---|
| • Beauty Parlour Course<br>• MS-CIT<br>• Advance Excel | • Tally with GST<br>• MSA-CIT<br>• Marathi & English Typing (Govt. & MKCL) |

**PMKVY (प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना) आणि National Urban Livelihood Mission (NULM) अंतर्गत National Skill Development Corporation, मान्यताप्राप्त कौशल्याधिष्ठीत कोर्सेस (Proposed)**

| | |
|---|---|
| • Sales Person Retail<br>• Senior Sales Person<br>• Bridal Makeup Artist<br>• Mutual Fund Associate<br>• Dietician Assistant<br>• Vermicomposting & Vermiculturing | • Retail Operations (Retail Store Executive)<br>• Beauty Therapy & Hair Styling Level-I<br>• Banking Sales Representative<br>• Yoga Therapist<br>• Mushroom Cultivation<br>• Spoken English & Communication Skills |

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**

- MPSC/PSI/STI/ASST फाऊंडेशन बॅच (कालावधी - ६ महिने)
- Bank Clerk / P.O. साठी यशस्वीता बॅच (कालावधी - ३ महिने)
- पोलिस / ग्रामसेवक / तलाठी / क्लार्क साठी नाविन्यता कोर्स (कालावधी - ३ महिने)

- **B.Voc. Courses : विद्यापीठ अनुदान आयोग व NSDC पुरस्कृत कौशल्याधिष्ठित पदवी अभ्यासक्रम**
  आपल्या महाविद्यालयात शै. वर्ष २०१४-१५ पासून बी.व्होक. (सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट) आणि बी.व्होक. (हॉस्पिटॅलिटी ॲण्ड टुरिझम) तसेच शै. वर्ष २०१८-१९ पासून बी.व्होक. (डेअरी प्रॉडक्टस ॲण्ड प्रोसेसिंग), बी.व्होक. (ॲग्रीकल्चर ॲण्ड सॉइल सायन्स) आणि बी.व्होक. (अकौंटिंग ॲण्ड टॅक्सेशन) हे तीन वर्षाचे कौशल्याधिष्ठित पदवी अभ्यासक्रम राबविले जातात. सदरचे अभ्यासक्रम युजीसी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व National Skill Qualification Framework (NSQF) अंतर्गत मान्यता प्राप्त आहे. या पदवी अभ्यासक्रमास कोणत्याही शाखेचे १२ वी पास झालेले विद्यार्थी गुणवत्तेनुसार प्रवेश घेऊ शकतात.
  **अधिक माहितीसाठी संपर्क : नोडल ऑफिसर प्रा. कवडे एस्.एन्. मो.नं. ८३०८१५८७५२.**

- **MS-CIT स्वतंत्र कक्षाची सुविधा**
- **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत चालविले जाणारे अभ्यासक्रम**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | पात्रता |
|---|---|---|
| १. | पूर्व तयारी | १० वी पास / नापास |
| २. | प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम. | १२ वी पास / पूर्व तयारी पास |

- **टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत चालविला जाणारा अभ्यासक्रम**
  योग व निसर्गोपचार डिप्लोमा अभ्यासक्रम (DYN)

## SHREYAS - Scheme for Higher Education Youth for Apprenticeship and Skills

(श्रेयस (Shreyas) - उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांकरिता शिकाऊ उमेदवार व कौशल्य योजना)

अतांत्रिक अभ्यासक्रमाकरिता उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता केंद्र शासनामार्फत सुरु असलेल्या 'श्रेयस' (Shreyas) या शिकाऊ उमेदवार व कौशल्य योजनेच्या अनुषंगाने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये रोजगार क्षमता वाढविणे हा उद्देश आहे. औद्योगिक सेवासंस्थांना लागणारे कौशल्य विकसित होऊन, शैक्षणिक अभ्यासक्रमाची उद्योग व सेवा क्षेत्राशी सांगड घालून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी व कौशल्यानुसार शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण व कौशल्य प्राप्त होणार आहे. त्यातून रोजगार उपलब्ध व्हावा या हेतूने सदरची योजना सुरु करण्यात आलेली आहे. प्रशिक्षण कालावधीत युवकांना विद्यावेतन (Stipend) दिले जाणार आहे. विविध शाखेतील विद्यार्थ्यांना 'श्रेयस' या योजनेचा लाभ व्हावा या हेतूने आपल्या महाविद्यालयाने 'श्रेयस' या योजनेस नोंदणी केलेली आहे. त्याअंतर्गत विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी www.shreyas.ac.in या वेबपोर्टलवर भेट द्यावी. 'श्रेयस' योजनेच्या सविस्तर माहिती व नाव नोंदणीसाठी आपल्या महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल, पारख बिल्डिंग येथे पुढील नोडल / प्लेसमेंट ऑफिसरशी संपर्क करावा.

प्रा. डॉ. जी. के. सानप - ९८८१७४८८८०　　प्रा. डॉ. एन्. डी. फटांगरे - ९६८९३००४९५
प्रा. एस्. सी. भुसाळ - ९९२२३०३६८३

# Intake Capacity (Academic Year 2021-22)

## (U.G. Courses)

| Class | Subject | Divisions | | Total No. of Div. | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | Grant | Non-Grant | | |
| F.Y.B.A. | | 2 | 3 | 5 | 600 |
| F.Y.B.Com. | | 1 | 4 | 5 | 600 |
| F.Y.B.Sc. | | 2 | 1 | 3 | 360 |
| F.Y.B.Sc. (Computer Science) | | - | 1 | 1 | 80 |
| F.Y.B.B.A. | | - | 1 | 1 | 80 |
| F.Y.B.B.A. (Computer Application) | | - | 1 | 1 | 80 |
| F.Y.B.C.A. (Sci.) | | - | 1 | 1 | 80 |
| B.Voc. (UGC & S.P.P.U.,Pune) | Software Development | - | 1 | 1 | 50 |
| First Year | Hospitality & Tourism | - | 1 | 1 | 50 |
| | Dairy Products & Processing | - | 1 | 1 | 50 |
| | Agriculture & Soil Sci. | - | 1 | 1 | 50 |
| | Accounting & Taxation | - | 1 | 1 | 50 |
| | * Food Processing Technology | - | 1 | 1 | 50 |
| | * Retail Management | - | 1 | 1 | 50 |
| | * Note : Subject to the approval of Govt. of Maharashtra | | | | |
| S.Y.B.A. | | 2 | 3 | 5 | 600 |
| S.Y.B.Com. | | 1 | 4 | 5 | 600 |
| S.Y.B.Sc. | | 2 | 1 | 3 | 360 |
| S.Y.B.Sc. (Computer Science) | | - | 1 | 1 | 80 |
| S.Y.B.B.A. | | - | 1 | 1 | 80 |
| S.Y.B.B.A. (Computer Application) | | - | 1 | 1 | 80 |
| S.Y.B.C.A. (Sci.) | | - | 1 | 1 | 80 |
| B.Voc. (UGC & S.P.P.U.,Pune) | Software Development | - | 1 | 1 | 50 |
| Second Year | Hospitality & Tourism | - | 1 | 1 | 50 |
| | Dairy Products & Processing | - | 1 | 1 | 50 |
| | Agriculture & Soil Sci. | - | 1 | 1 | 50 |
| | Accounting & Taxation | - | 1 | 1 | 50 |

# Intake Capacity (Academic Year 2021-22)
## (U.G. Courses)

| Class | Subject | Divisions | | Total No. of Div. | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | Grant | Non-Grant | | |
| T.Y.B.A. | | 2 | 2 | 4 | 480 |
| T.Y.B.Com. | | 1 | 3 | 4 | 480 |
| T.Y.B.Sc. | | 2 | 1 | 3 | 360 |
| T.Y.B.Sc. (Computer Science) | | - | 1 | 1 | 80 |
| T.Y.B.B.A. | | - | 1 | 1 | 80 |
| T.Y.B.B.A. (Computer Application) | | - | 1 | 1 | 80 |
| B.Voc. (UGC & S.P.P.U.,Pune) Third Year | Software Development | - | 1 | 1 | 50 |
| | Hospitality & Tourism | - | 1 | 1 | 50 |
| | Dairy Products and Processing | - | 1 | 1 | 50 |
| | Agriculture and Soil Sceince | - | 1 | 1 | 50 |
| | Accounting and Taxation | - | 1 | 1 | 50 |

# Intake Capacity (Academic Year 2021-22)

## (P.G. Courses & Research Centres)

| Class | Subject | Divisions | | Total No. of Div. | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | Grant | Non-Grant | | |
| M.A. I | Marathi | 1 | 1 | 2 | 120 |
| | Hindi | 1 | 1 | 2 | 120 |
| | English | 1 | 1 | 2 | 120 |
| | Sanskrit | 1 | 0 | 1 | 60 |
| | Economics | 1 | 1 | 2 | 120 |
| | Political Science | 1 | 1 | 2 | 120 |
| M.A. II | Marathi | 1 | 1 | 2 | 120 |
| | Hindi | 1 | 1 | 2 | 120 |
| | English | 1 | 1 | 2 | 120 |
| | Sanskrit | 1 | 0 | 1 | 60 |
| | Economics | 1 | 1 | 2 | 120 |
| | Political Science | 1 | 1 | 2 | 120 |
| M.Com. I | | 1 | 2 | 3 | 180 |
| M.Com. II | | 1 | 2 | 3 | 180 |
| M. Com. IT | | - | 1 | 1 | 60 |
| M.Sc. I | Organic Chemistry | - | 2 | 2 | 48 |
| | * Analytical Chemistry | - | 1 +1 (Proposed) | 1 +1 (Proposed) | 24 +24 (Proposed) |
| | Physics | - | 1 | 1 | 24 |
| | Botany | - | 1 | 1 | 24 |
| | Zoology | - | 1 | 1 | 24 |
| | Geography | - | 1 | 1 | 24 |
| | Computer Science | - | 1 | 1 | 30 |
| | Mathematics | - | 1 | 1 | 60 |
| | Electronics | - | 1 | 1 | 24 |
| M.Sc. II | Organic Chemistry | - | 2 | 2 | 48 |
| | Physics | - | 1 | 1 | 24 |
| | Botany | - | 1 | 1 | 24 |
| | Zoology | - | 1 | 1 | 24 |
| | Geography | - | 1 | 1 | 24 |
| | Computer Science | - | 1 | 1 | 30 |
| | Mathematics | - | 1 | 1 | 60 |
| | Electronics | - | 1 | 1 | 24 |
| P.G. Diploma in Journalism | | - | 1 | 1 | 30 |
| P.G. Diploma in Banking | | - | 1 | 1 | 60 |
| P.G. Diploma in Taxation | | - | 1 | 1 | 60 |
| | | | | | |

* Note : Subject to the approval of Govt. of Maharashtra

# Intake Capacity (Academic Year 2021-22)
## (P.G. Courses & Research Centres)

| Class | Subject | Divisions | | Total No. of Div. | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | Grant | Non-Grant | | |
| Research Centres (M.Phi. & Ph.D.) | Marathi | - | - | - | as per University Guidelines |
| | Hindi | - | - | - | |
| | English | - | - | - | |
| | Sanskrit | - | - | - | |
| | Economics | - | - | - | |
| | Political Science | - | - | - | |
| | Commerce | - | - | - | |
| | Physics | - | - | - | |
| | Zoology | - | - | - | |
| Research Centre (Ph.D.) | Chemistry | - | - | - | |
| Certificate Course in | French | - | - | - | |
| | German | | | | |
| M.Voc. I | Software Development | - | 1 | 1 | 50 |
| | Hospitality and Tourism | - | 1 | 1 | 50 |

# शैक्षणिक पात्रता नियमावली
# (Eligibility)

## शैक्षणिक पात्रता (Eligibility)

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांकडून फी आकारली जाते.

२. १२ वी उत्तीर्ण होऊन प्रथम वर्षात व पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन पदव्युत्तर वर्गात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार शैक्षणिक पात्रता फॉर्म व फी भरणे आवश्यक आहे.

३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठाची परीक्षा उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेश घेतील अशा सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार शैक्षणिक पात्रता फॉर्म व फी भरणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांचा विद्यापीठ बदल असल्यास सदर विद्यार्थ्यास मायग्रेशन सर्टिफिकेट जमा करावे लागेल.

५. द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्य यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक पात्रतेचा फॉर्म भरतांना आधारकार्ड क्रमांक, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी फॉर्मवर टाकणे अनिवार्य आहे.

## स्थलांतर प्रमाणपत्राबाबत (Migration Certificate)

१. विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी विद्यापीठ सोडून दुसऱ्या विद्यापीठात प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांना स्थलांतर प्रमाणपत्राची आवश्यकता असते. सदर प्रमाणपत्र विद्यापीठाकडून देण्यात येते.

२. त्याबाबत विद्यार्थ्यांना ऑनलाईन ॲप्लीकेशन विद्यापीठाचे संकेत स्थळ www.unipune.ac.in/certificate वर करावयाचे आहे.

३. स्थलांतर प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्याने स्थानांतर प्रमाणपत्र (T.C.) मूळप्रत व अलिकडे दिलेल्या परीक्षेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. परंतु विद्यार्थ्याचे स्थानांतर प्रमाणपत्र मूळप्रत अन्य ठिकाणी प्रवेशासाठी दिले असल्यास महाविद्यालयाकडून अधिकची एक स्थानांतर प्रमाणपत्राची प्रत घ्यावयाची आहे.

## बहि:स्थ विभाग

१. प्रथम वर्ष बहि:स्थ विभागामार्फत केले असल्यास अशा विद्यार्थ्यांला द्वितीय वर्षात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येईल. तसेच प्रथमवर्ष नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असल्यास अशा विद्यार्थ्याला द्वितीय वर्षास बहि:स्थ विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येईल परंतू अशा विद्यार्थ्यांनी संपूर्ण विषय उत्तीर्ण झालेले असावेत.

२. विद्यापीठाच्या बहि:स्थ विभागामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांना देण्यात येणारा UID No. / Eligibility No. हाच विद्यार्थ्यांचा पात्रता क्रमांक असून महाविद्यालयात तोच क्रमांक प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांनी जमा करावयाचा आहे.

३. द्वितीय वर्षासाठी बहि:स्थ विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असल्यास त्याला तृतीय वर्षात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येणार नाही. त्याचप्रमाणे द्वितीय वर्षासाठी नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असल्यास त्याला तृतीय वर्षास बहि:स्थ विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येणार नाही.

**विशिष्ट पाठ्यक्रमासाठी / अध्ययनक्रमासाठी विद्यार्थी म्हणून प्रवेश घेणाऱ्या व्यक्तीसाठी अर्हतेच्या व पात्रतेच्या शर्ती महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर (www.sangamnercollege.edu.in) उपलब्ध आहे.**

## संस्था / महाविद्यालयाकडून देण्यात येणाऱ्या योजना व पुरस्कार

**माजी विद्यार्थी श्री. अविनाश भोसले विद्याधन कलश योजना**

शासनाकडून ज्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची फी सवलत मिळत नाही. अशा गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण प्रसारक संस्था स्वत:च्या विद्याधन कलश योजनेअंतर्गत शिक्षण पूर्ण करण्यासाठी पुढील अटींची पुर्तता करण्याच्या अधिन राहून परतीच्या अटीवर आर्थिक सहाय्य करते यासाठी खालील अटी आहेत.

- शिक्षण प्रसारक संस्थेतील व्यवस्थापन मंडळातील व्यक्ती किंवा शिक्षकांनी सदर विद्यार्थ्यांचे नैतिक हमी पत्र शिफारशी सोबत भरून देणे आवश्यक आहे.
- शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षांनी सदर विद्यार्थ्याने या शिष्यवृत्तीची रक्कम परत देणे अपेक्षित आहे. त्यासाठी या रक्कमेचा चेक शिष्यवृत्ती घेते वेळी संस्थेकडे देणे आवश्यक आहे.
- अनाथ विद्यार्थिनी / अनाथ विद्यार्थी / खेळाडू / एन्.एस्.एस्. किंवा एन्.सी.सी. मधील सहभाग/गुणानुक्रमे हुशार विद्यार्थी / गरीब विद्यार्थी या निकषांवर सदर शिष्यवृत्ती दिली जाते.
- शिष्यवृत्ती अर्ज मंजूर / नामंजूर करणेचा अधिकार शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या समितीकडे राखून ठेवला आहे.
- सदर शिष्यवृत्ती बिनव्याजी शैक्षणिक कर्ज स्वरुपाची आहे.
- सदर शिष्यवृत्ती अर्ज शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क – ९७३०९३४०१८ / ९६३७४७५४७६.**

**स्वाभिमान कोश**

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना म्हणजे ग्रामीण भागातून येणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे साधन ! संगमनेर महाविद्यालयात या योजनेत विविध स्वरुपाची कामे करून अनेक प्रतिभावान विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करत आपले आयुष्य घडवले. या योजनेमुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी, वह्या-पुस्तके, बस/रिक्षा भाडे इ. किरकोळ खर्च स्वत:च्या परिश्रमातून करता येतो व स्वावलंबनाचे शिक्षण घेता येते.

कमवा व शिका योजनेकरीता निधी उभारण्यासाठी शिक्षण प्रसारक संस्थेने स्वत:चा 'स्वाभिमान कोश' उभा केला. या कोशातील निधीच्या सहाय्याने महाविद्यालयातील प्रत्येक काम मागणाऱ्या विद्यार्थ्याला काम मिळणार आहे. ज्या विद्यार्थ्यांची काम करण्याची इच्छा आहे व शिक्षणाची आस आहे असा कोणताही विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची दखल शिक्षण प्रसारक संस्थेने 'स्वाभिमान कोशा' च्या माध्यमातून घेतलेली आहे, त्यामुळे अनेक विद्यार्थ्याचे शिकण्याचे स्वप्न साकार होणार आहे.

**माजी विद्यार्थी श्री. रमेशजी गुणे पुरस्कृत प्राचार्य म.वि.कौंडिण्य स्मृती पुरस्कार चतुरस्त्र विद्यार्थी पुरस्कार :**

श्री. रमेश गुणे यांचे महाविद्यालयीन शिक्षण १९७१ ते १९७५ या कालावधीत शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर नगरपालिका कला, दा.ज.मालपाणी वाणिज्य आणि ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर येथे पुर्ण झाले. तत्कालीन प्राचार्य म.वि.कौंडिण्य यांनी श्री. रमेश गुणे यांची चतुरस्त्रता पाहुन वार्षिक मात्र एक रुपया इतक्या नाममात्र शुल्कात त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण केले. हे ऋण व्यक्त करण्यासाठी दि.०९ जानेवारी २०१७ रोजी भारत भेटीला आलेल्या श्री. रमेश गुणे यांनी प्राचार्य श्री.म.वि. कौंडिण्य यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रतिवर्षी शिक्षण प्रसारक संस्थेच्या विविध महाविद्यालयात शिकणाऱ्या व समितीने शिफारस केलेल्या नाट्य, नृत्य, समाजसेवा, निबंध,चित्रकला,

वक्तृत्त्व अशा विविधांगी कलांमध्ये तसेच क्रिडा क्षेत्रात व जिल्हास्तरीय वा त्यापुढील पारितोषिके मिळविणाऱ्या आणि अभ्यासातही विशेष श्रेणी मिळविणाऱ्या तसेच राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, कमवा व शिका योजना आदींमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पुरस्कार योजना राबविण्यात यावी यासाठी रु.११,००,०००/- (अक्षरी रुपये अकरा लक्ष मात्र) संस्थेकडे सुपूर्त केले व सदरच्या ठेवीवर येणाऱ्या व्याजाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी 'प्राचार्य म.वि.कौंडिण्य स्मृती चतुरस्त्र विद्यार्थी पुरस्कार' देण्यात येतो.

## प्राचार्य म.वि. कौंडिण्य स्मृति संशोधन पुरस्कार

विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना मिळावी व सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी आपल्या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म.वि.कौंडिण्य यांच्या स्मरणार्थ विद्यार्थी संशोधन प्रकल्प स्पर्धा घेतल्या जातात. विभागीय व शाखानिहाय स्पर्धा होऊन ज्या प्रकल्पांची निवड होते. अशा संशोधन प्रकल्पांना श्रमिक उद्योग समूहाचे संस्थापक श्री. साहेबरावजी नवले यांनी दिलेल्या आर्थिक सहयोगातून रोख व पुस्तकांच्या स्वरुपात पारितोषिके दिली जातात. तसेच विद्यार्थ्यांना सुवर्ण, ब्राँझ व सिल्व्हर पदकांनी उच्च विद्याविभूषितांकडून सन्मानित करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून सुरू झालेल्या या संशोधन स्पर्धांतून प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली शै. वर्ष २०१९-२० पर्यंत २४१५ प्रकल्प सादर करण्यात आलेले आहेत. दिवसेंदिवस या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा प्रतिसाद वाढत आहे.

## माजी विद्यार्थी श्री. राजेशजी भेडा पुरस्कृत भक्तीगीत गायक श्री.शामसुंदर भेडा स्मृती पुरस्कार व माजी विद्यार्थी श्री. राजेशजी भेडा दिव्य दिव्यांग पुरस्कार –

आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. राजेशजी भेडा (अध्यापक, फॅशन टेक्नॉलॉजी इंस्टिट्युट, नवी दिल्ली) यांनी भजन गायन क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता त्यांच्या वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ ''भक्तिगीत गायक श्री. शामसुंदरजी भेडा स्मृती पुरस्कार'' व दिव्य-दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, याकरिता ''माजी विद्यार्थी डॉ. राजेश भेडा दिव्य-दिव्यांग पुरस्कार'' या दोन पुरस्कारांचे आयोजन केलेले आहे. डॉ. राजेशजी भेडा यांनी या दोन पुरस्कारांसाठी प्रत्येकी एक लक्ष रुपयांचा कायम निधी संस्थेकडे ठेवलेला आहे व त्याच्या व्याजाच्या माध्यमातून हे पुरस्कार देण्यात येत आहेत.

# परीक्षेसंबंधी आवश्यक माहिती

- विद्यापीठ परिपत्रक क्रमांक परीक्षा/समन्वय/८० दि. ११ जानेवारी २०१० व परिपत्रक क्रमांक परीक्षा समन्वय/२६५ दिनांक २५/१/२०१० अन्वये महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान बी.बी.ए., बी.बी.ए.(कॉम्प्युटर ॲप्लीकेशन), बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) या वर्गाच्या विद्यापीठ परीक्षा सन २०१०-११ पासून महाविद्यालयामार्फत घेतल्या जात आहेत.
- एफ्.वाय.,एस्.वाय.,बी.ए., एफ्.वाय.,एस्.वाय. बी.कॉम.,एफ्.वाय.,एस्.वाय.,टी.वाय.बी.एस्सी., या वर्गाच्या विद्यापीठ परीक्षा सेमिस्टर पद्धतीनुसार होतील.
- एम्.ए.,एम्.कॉम.,एम्.एस्सी.(कॉम्प्युटर सायन्स) व एम्.सी.ए.,बी.सी.ए.(विज्ञान) या वर्गाच्या विद्यापीठ परीक्षा (Choice Based Credit System) नुसार होतात. या परीक्षेचे ५० पैकी गुण विद्यापीठाकडे पाठविले जातात.
- एफ्.वाय.,एस्.वाय.,टी.वाय.बी.ए.,बी.कॉम. या वर्गाच्या टर्मएंड परीक्षा सर्व विद्यार्थ्यांनी देणे आवश्यक आहे. या परीक्षेचे २० पैकी गुण विद्यापीठाकडे पाठविले जातात.
- एफ्.वाय.,एस्.वाय.,टी.वाय.बी.एस्सी., बी.बी.ए. (कॉम्प्युटर ॲप्लीकेशन), बी.बी.ए.,बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) या वर्गाच्या अंतर्गत परीक्षा विद्यार्थ्यांनी देणे आवश्यक आहे. या परीक्षेचे १० पैकी गुण विद्यापीठाकडे पाठविले जातात.
- प्रथम वर्षाच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गांच्या परीक्षा शासन व सा.फु.पुणे विद्यापीठाच्या स्वायत्त महाविद्यालयांसंदर्भात असलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे होतील.

- द्वितीय वर्षातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना पर्यावरण जागृती (Environmental Awareness) ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय पदवी प्राप्त होऊ शकणार नाही.
- महाविद्यालयाच्या सूचनाफलकावर परीक्षेसंबंधी सर्व सूचना वेळोवेळी लावल्या जातात. विद्यार्थ्यांनी त्या पाहून त्यानुसार विहीत मुदतीत ऑनलाईन फॉर्म भरावे. जे विद्यार्थी वेळेत ऑनलाईन फॉर्म भरणार नाहीत त्यासंबंधीची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

**अधिक माहितीसाठी संपर्क : ८८८८१४७१९५ / ८८८८५६७०३२**

## सर्व प्रथम वर्ष विद्यार्थी क्रीडा व शारीरिक शिक्षण परीक्षा

**(एफ्.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./बी.सी.एस्./बी.बी.ए./बी.सी.ए./सर्व बी.व्होक कोर्स करीता अनिवार्य)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालयामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षण विषय अनिवार्य करण्यात आलेला असून त्याचा अद्ययावत अभ्यासक्रम सर्व प्रथम वर्ष विद्यार्थ्यांना सक्तीचा करण्यात आलेला आहे. सदर विषयास अनिवार्य विषय म्हणून दर्जा प्राप्त असल्याने वार्षिक निकालामध्ये हा ATKT नियमामध्ये समाविष्ट आहे.

**क्रीडा व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम / परीक्षा राबविण्याचा मुख्य उद्देश (हेतू)**

विद्यार्थ्यांच्या अंगी बौद्धीक क्षमतेसोबत मानसिक व मुख्यत्वे: शारीरिक सदृढता / क्षमतेचा विकास व्हावा व राष्ट्रासाठी सुदृढ व आरोग्य संपन्न पिढी तयार व्हावी, या उदात्त हेतूने हा विषय विद्यापीठामध्ये अनिवार्य केलेला आहे.

**परीक्षा / मुल्यमापन स्वरुप**

- शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रत्येक वर्गासाठी विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन आयोजित करून अभ्यासक्रम समजावून दिला जाईल.
- प्रथम सत्र व द्वितीय सत्रातील अभ्यासक्रमानुसार विषय घटकांचे मार्गदर्शन केले जाईल व वेळोवेळी विद्यार्थ्यांसाठी सुचना व परीक्षण घटकांविषयी माहिती नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे वेळोवेळी नोटीसबोर्ड पाहणे आवश्यक आहे.
- नियोजित वेळापत्रकानुसार मुल्यमापन घटकांचे परिक्षण केले जाईल. त्यासाठी महाविद्यालयाचे ओळखपत्र व क्रीडा गणवेश परिधान करणे अनिवार्य आहे.
- शारीरिक दृष्ट्या अपंग तथा अतंदुरूस्त विद्यार्थ्यांनी शासकीय वैद्यकीय दाखला सादर करणे, अनिवार्य करण्यात आलेले आहे. (Appendix - V) इतर कोणत्याही डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.
- दिलेल्या वेळापत्रकानुसार परिक्षण घटकांचे मुल्यमापन (परीक्षा) झालेनंतर पुनर्परीक्षा लेट फी (रु.१००/-) व सुपर लेट फी (रु.५००/-) दंड आकारून घेतली जाईल. पुनर्परीक्षेचे वेळापत्रक स्वतंत्रपणे पुन्हा प्रसिद्ध केले जाईल.
- मुल्यमापन (परीक्षा) झालेनंतर परीक्षा विभागाला निकाल हस्तांतरीत केलेनंतर मुल्यमापनाचे कार्य पुन्हा केले जाणार नाही, व यासंदर्भात कोणीही कोणत्या कारणास्तव भेटू नये, तथा विनंती करू नये.
- परीक्षा (Test) करीता येताना कोणत्याही मौल्यवान वस्तु / मोबाईल / पर्स / पॉकेट सोबत आणू नये. सदर गोष्टी हरवल्यास महाविद्यालय / परीक्षा व्यवस्थापन यास जबाबदार नाही, याची पुर्णपणे नोंद घ्यावी.
- महत्वाचे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी - विद्यार्थीनींना सदर मुल्यमापन (परीक्षा) प्रक्रियेतून विशेष सवलत (Appendix - IV) देण्यात आलेली आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क : शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ.कदम ए.एस्. मो.नं. ९८८१०५३४८१.**

# विद्यार्थ्यांना दिले जाणारे विविध दाखले

एल. सी. / टी. सी. / बोनाफाईड विभाग

| अ. नं. | प्रमाणपत्राचे नाव | अर्जासोबत कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे | छापील मागणी अर्जावर सही घ्यावी | प्रमाणपत्राची फी | प्रमाणपत्र मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | बोनाफाईड | एल.सी./टी.सी. (झेरॉक्स प्रत) | अकौंट विभाग | रु. २०/- | एक दिवसानंतर |
| २. | एल.सी./टी.सी. | मार्कशीट (महत्वाचे) एल.सी./टी.सी. (झेरॉक्स प्रत) | अकौंट, ग्रंथालय, परीक्षा, शिष्यवृत्ती व प्रवेश विभाग प्राचार्य/उपप्राचार्य | रु.६०/१००/२०० (सविस्तर नियम टी.सी. विभागात पहावे.) | दोन दिवसानंतर |
| ३. | टी.सी.फॉर मायग्रेशन (दुसऱ्या विद्यापीठात प्रवेशासाठी) | मार्कशीट (महत्वाचे) एल.सी./टी.सी. (झेरॉक्स प्रत) | अकौंट विभाग, प्राचार्य/ उपप्राचार्य | रु. ६०/१००/२०० (सविस्तर नियम टी.सी. विभागात पहावे.) | दोन दिवसानंतर |
| ४. | डुप्लीकेट टी.सी. | मार्कशीट (महत्वाचे) मुळ टी.सी.झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, पोलीस स्टेशनची एफ्.आय.आर.प्रत, रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र. | अकौंट विभाग, प्राचार्य / उपप्राचार्य | रु.६०/१००/२००/- (सविस्तर नियम टी.सी. विभागात पहावेत.) | दोन दिवसानंतर |
| ५. | फॉरमॅट एल.सी. (१९९९-२००० पर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांसाठी) | एल.सी./टी.सी. (झेरॉक्स प्रत) | अकौंट विभाग | रु. ५०/- | दोन दिवसानंतर |

- टी.सी./बोनाफाईड छापील मागणी अर्ज एल्.सी./टी.सी. विभागातून घ्यावा व फी अकौंट विभागात जमा करावी. अर्जाची पुर्तता करून अर्ज टी.सी. विभागात जमा करावा.

**दाखले मिळविण्यासाठी खालील बाबी विचारात घ्याव्यात.**

- झेरॉक्स प्रती विद्यार्थ्यांनी सेल्फ अ‍ॅटेस्टेड किंवा महाविद्यालयाने अ‍ॅटेस्टेड केलेल्या जोडाव्यात.
- टी.सी./बोनाफाईड घेण्यासाठी विद्यार्थ्याने स्वत:चे ओळखपत्र सोबत आणावे.
- बोनाफाईड सर्टीफिकेट मिळविण्यासाठी महाविद्यालयात प्रवेशावेळी जमा केलेल्या मुळ दाखल्याची झेरॉक्स प्रत साक्षांकित करून जोडावी.
- महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले विद्यापीठ परिपत्रक क्रं. PGS/542. दि. 17/02/2011 नुसार दाखला फी आकारली जाईल.

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून विद्यापीठ बदल प्रमाणपत्र (Migration Certificate) मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या (unipune.ac.in) वेबसाईटवरून अर्ज करावा. त्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून T.C. for Migration असा शेरा असलेला डुप्लीकेट टी.सी. घ्यावा.

**महत्वाचे : प्रवेश घेतांना मुळ दाखला किंवा टी.सी. जमा करण्यापूर्वी त्याच्या २० झेरॉक्स प्रती काढून काही प्रती महाविद्यालयातून साक्षांकित करून घ्याव्यात. साक्षांकित केलेली एक प्रत लॅमिनेशन करून कायम स्वरुपी जतन करून ठेवावी. ती प्रत दाखवून गरज असेल तेव्हा इतर प्रती साक्षांकित करुन घ्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांनी टी.सी./दाखल्याची स्कॅन कॉपी मोबाईल / ई-मेल मध्ये जतन करून ठेवावी.**

**अधिक माहितीसाठी संपर्क : ९७६३४७८८८१/९५०३९११७४०.**

## श्री. माधवलाल मालपाणी योग व निसर्गोपचार केंद्र

**खालील व्याधींवर प्रभावी उपचार : -**

| | |
|---|---|
| पाठदुखी (Spinal Pain) | बद्धकोष्ठ (Constipation) |
| गुडघेदुखी (Knee Pain) | त्वचारोग (Skin diseases) |
| कमरदुखी (Back Pain) | श्वसनविकार(Respiratory disorders) |
| मानदुखी (Neck Pain) | मानसिक ताण तणाव (Stress) |
| स्थुलपणा (Obesity ) | मानसिक चंचलता (Anxiety) |
| रक्तदाब (Hypertension) | निद्रानाश (Insomnia) |
| मधुमेह (Diabetes-Mallitus) | रक्ताल्पता (Anemia) |
| अपचन (Indigestion) | हृदयविकार (Cardiac problems) |
| आम्लपित्त (Acidity) | मज्जासंस्थेचे आजार (CNS disorders) |
| मुळव्याध (Piles) | मणक्यांचे आजार (Spinal disorders) |
| मूतखडा (Kidney Stone) | संधिवात (Joint pain) |
| वंध्यत्व (Infertility) | वात,कफ,पित्तविकार निवारण (Auto immune disorders) |
| पोटातील जंत (Worm) | स्नायुंशी संबंधित विकार (Ligament related problems) |
| आंत्रव्रण (Ulcer) | अर्धशिशी व अन्य स्वरुपाची डोकेदुखी (Migraine) |
| आंत्रदाह (Gastritis) | नेत्रदोष (Eye disorders) |
| आमांश (Dysentery) | अर्धांगवायू (Paralysis) |

**सुविधा : -**

- ✔ तज्ज्ञ डॉक्टर
- ✔ महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था
- ✔ रुग्णांचे अभ्यासपूर्ण समुपदेशन
- ✔ अनुभवी थेरपिस्ट
- ✔ सुसज्ज निवास व्यवस्था (जनरल/स्पेशल/डिलक्स)
- ✔ आल्हाददायक नैसर्गिक वातावरण
- ✔ भोजन व्यवस्था
- ✔ सुसज्ज ग्रंथालय
- ✔ स्वतंत्र योग षटक्रिया कक्ष
- ✔ दृकश्राव्य कक्ष
- ✔ आरोग्यविषयक व्याख्याने
- ✔ वॉकिंग ट्रॅक
- ✔ नैसर्गिक औषधे उपलब्ध
- ✔ ध्यानधारणा प्रशिक्षण
- ✔ २४ X ७ विज पुरवठा

**उपलब्ध उपचार**

लघुकटी स्नान (Sitzbath)
गुद्वस्ति चिकित्सा (Enema)
भौतिक चिकित्सा (Physio therapy)
नलधावन चिकित्सा (Douche therapy)
पृथ्वी चिकित्सा (Mud bath)
शुष्क बाष्प स्नान (Sauna bath)
शिरोधारा (Shirodhara)
हस्त-पाद स्नान (Arm & foot bath)
कटी स्नान (Hip bath)
बाष्प स्नान (Steam bath)
मेरुरज्जू मेघकशा (Spinal spray)
वृत्ताकार जलचिकित्सा (Circular jet bath therapy)
मज्जना स्नान (Immersion bath)
मेरु- रज्जू स्नान (Spinal bath)
स्थूलांत्र जल चिकित्सा (Colon hydro therapy)
अभ्यंग चिकित्सा (Massage therapy)
सूचिवेध चिकित्सा (Acupanture)
योग चिकित्सा (Yoga therapy)
आहार चिकित्सा (Diet therapy)
रंग व चुंबक चिकित्सा (Chroma & magneto therapy)

**अधिक माहितीसाठी संपर्क : ९९७५८८५८५५ / ९८२२९२६६४४.**

## महाविद्यालय ग्रंथालयाची वैशिष्ट्ये

पदवी व पदव्युत्तर वर्गांसाठी स्वतंत्र व प्रशस्त ग्रंथालय
विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका
शिक्षकांना स्वतंत्र अभ्यासिका
अवांतर वाचनासाठी कादंबऱ्या व इतर साहित्य
१,३३,८१९ एवढी ग्रंथसंपदा
विविध विषयांची १३९ नियतकालिके
विद्यार्थी व शिक्षकांना स्वतंत्र इंटरनेट सुविधा
न्युज पेपर स्टँड, न्यु अरायव्हलसाठी स्वतंत्र शोकेस
ग्रंथालय ओळखीसाठी परिचयपर व्याख्याने
इंटरनेट व Wi-Fi सुविधा
मौल्यवान CD,DVD संग्रह
मौल्यवान संस्कृत हस्तलिखिते
सरस्वती कार्ड-हुशार विद्यार्थ्यांसाठी
जादा लायब्ररी कार्ड, स्कॅनिंग सुविधा
ग्रंथ परिवार योजना
स्वतंत्र नियतकालिक कक्ष
प्रसाधनगृह-विकलांग विद्यार्थ्यांसाठी
बुक बँक योजना
मुक्तद्वार योजना
विकलांग विद्यार्थ्यांना बसण्याची स्वतंत्र व्यवस्था
ग्रंथालयाची माहिती संगणकावर उपलब्ध (web OPAC)
N-List आणि DELNET डेटाबेस (E-Books & E-Journals)
इंटरनेटसाठी टॅबलेटस् पी.सी.ची सोय
देखरेखीसाठी CCTV कॅमेरा
पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची सुविधा
ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन
प्रश्नसंच सुविधा, सिलॅबस सुविधा, ब्रेल बुक्स
Library Page on College website.

## विद्यार्थी मतदार जागृती अभियान

(महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रं. २०१६/प्र.क्रं.६८३/१६/विशि-३,दि.१५मे,२०१७)

ज्या विद्यार्थ्याचे वय वर्षे १८ पूर्ण झाले आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयातील, गावातील बीएलओ किंवा नजीकच्या तहसिल कार्यालयाशी संपर्क साधून मतदार यादीत नाव नोंदविणे अनिवार्य आहे.

**मतदार नाव नोंदणी करण्यासाठी फॉर्म (नमुना ६) व त्यासाठी लागणारे कागदपत्रे -**

पासपोर्ट साईजचे दोन फोटो, शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स, मतदार यादीत नांव असलेले आई,वडील किंवा भाऊ यांपैकी एक मतदान कार्ड झेरॉक्स, रेशनकार्ड झेरॉक्स आणि आधारकार्ड झेरॉक्स इ. सोबत जोडावेत.

**अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या मतदार नांव नोंदणी नोडल अधिकारी किंवा प्रवेश विभागाशी संपर्क साधावा. (संपर्क मो.नं. ९८९०७६६२०७, ८८०६५१९७४०)**

# विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता

- आपल्या महाविद्यालयाची चांगली जीवनमूल्ये, आदर्श वर्तन, शिस्तप्रियता, वक्तशीरपणा, अभ्यासातील उत्कृष्ट गुणवत्ता आणि अभ्यासक्रमपूरक उपक्रमांमध्ये उत्स्फुर्त सहभाग या सर्वांना या महाविद्यालयात सर्वोच्च महत्त्व दिले जाते.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षेला बसण्यासाठी वर्गातील उपस्थिती किमान ७५% असणे आवश्यक आहे.
- विभाग प्रमुख, विषय शिक्षक व पालक-शिक्षक यांच्या पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहू नये.
- सर्व विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम, अभ्यासक्रमेत्तर उपक्रम याबाबतच्या सूचना वेबसाईटवर व सूचना फलकावर उपलब्ध करून दिल्या जातात, त्या पाहणे आपल्या हिताचे आहे. सूचना न वाचल्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याचे नुकसान झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.
- पालकांनी शक्य तेव्हा प्राचार्य/उपप्राचार्य/विभागप्रमुख/विषयशिक्षक किंवा पालकशिक्षक यांना भेटून विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी माहिती घ्यावी.
